आज जगातील प्रत्येक ठिाणी भ्रष्टाचार, अप्रामाणिकपणा आणि लाचखोरी हाच मापदण्ड असल्याचे दिसून येते. जग ह्याचप्रकारे चालत असल्याचे दिसून येते कारण त्यांस तसेच शिकविण्यात आले आहे; यापेक्षा उत्तम काय ते त्यांस माहीत नाही. तथापि, जेव्हा आपण देवाच्या लोकांमध्ये – आमच्यात – अप्रामाणिकपणा, अनीतिमानता आणि सत्याची उणीव पाहतो, तेव्हा खरोखर दुःख वाटते – कारण कमीत कमी आपण चांगले वागायला हवे.

खरेपणाने, प्रामाणिकपणे, शुद्धतेने आणि नीतिमत्वाने कसे चालावे हे आपणास माहीत असावयास हवे, कारण याविषयी आपण देवाच्या वचनात वाचतो. याहीपेक्षा वाईट हे आहे की आपण पाळकांत, सुवार्तिकांच्या, शिक्षकांच्या आणि वचनाची सेवा करणाऱ्यांच्या जीवनांत अनीतिमानता, अप्रामाणिकपणा आणि सचोटीची उणीव पाहतो. आमच्यापैकी प्रत्येकास अशा ठिकाणी येऊन पोहोचण्याची गरज आहे जेथे आपण प्रामाणिकपणा, सचोटी आणि नीतिमत्व यांस पूर्णपणे समर्पित राहू, आणि हे पुस्तक या गुणांस आमच्यात प्रोत्साहन देईल.

आशीष रायचूर

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org

# प्रमाणिकपणा



**आशीष रायचूर**

**केवळ विनामूल्य वाटपासाठी**

ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारत द्वारे मुद्रित आणि वितरित।
प्रथम आवृत्ती मुद्रित, अक्तूबर 2018

**सम्पर्क**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

विशेष उल्लेख वळगता, पवित्र शास्त्राचे सर्व संदर्भ बायबल सोसायटी ऑफ इंडिया द्वारा प्रकाशित बायबलमधून घेण्यात आले आहेत.

**आर्थिक भागीदारी**

ह्या पुस्तकाचे विनामूल्य वाटप ऑल पीपल्स चर्चच्या सदस्यांच्या, भागिदारांच्या आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपणास ह्या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त झाला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांचे मुद्रण आणि वाटप यात मदत व्हावी म्हणून आर्थिकरित्या सहाय्य करण्यास आपणास निमंत्रित करतो. कृपया apcwo.org/give ह्या संकेतस्थळावर जाऊन आपले दान कसे पाठवावे हे पाहण्यासाठी ह्या पुस्तकाच्या मागे देण्यात आलेले ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाकयादी**

जर आपणास आमची नवीन पुस्तके मिळविण्यासाठी आपले नाव आमच्या डाकयादीत हवे असेल तर कृपया ईमेलद्वारे आपला योग्य पत्ता पाठवावा : contact@apcwo.org

**भारतात विनामूल्य बल्क ऑर्डर**

आपल्या स्थानिक मंडळीत, बायबल अभ्यासगटांत, बायबल कॉलेज, सेमिनार, सभांत, पुस्तकालयांत, व्यापार केन्द्रांत वाटपासाठी आम्ही आनंदाने आपली पुस्तकें विनामूल्य पाठवू इच्छितो. कृपया ईमेलद्वारे पुस्तकांची संख्या आणि प्राप्त करणाऱ्यांचा पत्ता पाठवावा : contact@apcwo.org

(Marati book - Integrity)

## ऑल पीपल्स चर्च
## बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षण केंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज और सेवा प्रशिक्षण केंद्र (एपीसी–बीसी) भारतातील बँगलोर येथे आत्म्याने युक्त, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षण आणि सिद्धांताच्या दृष्टीने यथार्थ तसेच देवाच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासोबत पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विश्वासणाऱ्यांस सेवेसाठी तयार करते. सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास घडून यावा असा आमचा विश्वास आहे आणि दैवीय चारित्र्य, देवाच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कार्यांवर जोर दिला जातो – सर्वकाही देवाच्या निकट सान्निध्याने साध्य झाले आहे.

एपीसी–बीसीमध्ये यथार्थ शिकवणीव्यतिरिक्त आम्ही प्रत्यक्ष रूपात देवाची प्रीती, पवित्र आत्म्याचा अभिषेक आणि सान्निध्य व देवाचे अलौकिक कार्य यास महत्व देतो. कित्येक तरूण स्त्री आणि पुरुषांनी हे प्रशिक्षण प्राप्त केले आहे आणि त्यांना त्यांच्या जीवनातील पाचारण पूर्ण करण्यासाठी बाहेर पाठविण्यात आले आहे.

खालील तीन पदव्या दिल्या जातात :

Theology and Christian Ministry (C.Th.) या विषयात एकवर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) या विषयातं दोन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theologyand Christian Ministry(B.Th.) या विषयात तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

आठवड्याच्या प्रत्येक दिवशी, सोमवार ते शुक्रवारपर्यंत सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग घेतले जातात. विद्यार्थी, नोकरी करणारे, आणि गृहिणी हे सर्वच ह्याा वर्गात भाग घेऊ शकतात आणि 1 वाजेनंतर आपल्या कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रीपुरुषांसाठी वेगवेगळी वस्तीगृहे आहेत. विद्याार्थी दर आठवड्यास दोन ते पाच वाजेपर्यंत क्षेत्रीय कार्य, विशेष सेमिनारं, दुपारच्या वेळी प्रार्थना व उपासना यात वेळ घालवितात. दुपारच्या सभा घरून येणाऱ्या विद्याार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. सर्व विद्याार्थ्यांस प्रोत्साहन दिले जाते की त्यांनी आठवड्याच्या शेवटी एका किंवा त्यापेक्षा अधिक स्थानिक मंडळीत सेवा करावी.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम इत्यादींविषयी अधिक माहितीसाठी आणि अर्जडाऊनलोड करण्यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट दयावी : **apcwo.org/biblecollege**

# प्रामाणिकपणा

# अनुक्रमणिका


परिचय ........................................................ ०१

१. प्रामाणिकपणाविषयी सूचना.................................. ०५

२. देव आमच्या प्रामाणिकपणाचे (अथवा आमच्यात
तो आहे किंवा नाही!) परीक्षण करतो आणि जाणतो.. १२

३. तरी आपण आपल्या प्रामाणिकपणाविषयी
तडजोड का करतो? ....................................... १५

४. आमच्या अप्रामाणिकपणाचे परिणाम..................... २०

५. सरळ (प्रामाणिक) माणसाचे आशीर्वाद................ २६

६. प्रतिसाद — मुक्ति, पश्चाताप, त्याग आणि समर्पण.. ३१

# परिचय

आपण आज जगात जो भ्रष्टाचार पाहतो त्याविषयी सांगण्यासारख्या आमच्याजवळ अनेक गोष्टी आहेत, विशेषकरून जेव्हा आम्ही सरकारी कार्यालयांस आणि इतर ठिकाणांस भेट देतो तेव्हा आम्हाला जवळजवळ सर्वत्र भ्रष्टाचार, अप्रामाणिकपणा आणि लाचखोरी आढळून येते. असे दिसते की हाच मापदण्ड आहे. अप्रामाणिकपणा, ठकविणे आणि लबाडी ह्या गोष्टी करण्यासारखी कारणे जोवर असतात, तोवर ह्या गोष्टी मान्य असल्याचे दिसून येते.

तथापि, जेव्हा आपण देवाच्या लोकांमध्ये — आमच्यात — अप्रामाणिकपणा, अनीतिमानता आणि सत्याची उणीव पाहतो, तेव्हा खरोखर दु:ख वाटते — कारण कमीत कमी आपण चांगले वागायला हवे. खरेपणाने, प्रामाणिकपणे, शुद्धतेने आणि नीतिमत्वाने कसे चालावे हे आपणास माहीत असावयास हवे, कारण देवाचे वचन आणि ह्या गोष्टींविषयी ते जे काही शिकविते ते आपण वाचतो. याहीपेक्षा वाईट हे आहे की आपण पाळकांत, सुवार्तिकांच्या, शिक्षकांच्या आणि वचनाची सेवा करणाऱ्यांच्या जीवनांत अनीतिमानता, अप्रामाणिकपणा आणि सचोटीची उणीव पाहतो. मला खात्री आहे की आमच्यापैकी अनेकजण ‘ख्रिस्ती’ लाचखोरी, लबाडी, अप्रामाणिकपणा इत्यादी विषयींच्या गोष्टी सांगू शकतात.

जेव्हा आम्ही बँगलोरमध्ये ऑल पीपल्स चर्चची स्थापना केली आणि पाळक म्हणून सेवा सुरू केली, तेव्हा आमच्या मनात हे होते की प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती सत्य बोलेल. कदाचित आम्ही ह्याप्रकारे विचार केला कारण ज्या लहान समुदायांत आम्ही काम केले होते आणि ज्यांच्याशी आम्ही व्यवहार केला होता, त्यांच्यापैकी बहुतेक लोक खरे बोलत आणि आम्ही लोकांवर सहज पूर्णपणे विश्वास करीत होतो. म्हणून हा विचार आमच्या मनात होता. तथापि, ख्रिस्ती लोकांस खोटे बोलतांना पाहून आम्हाला धक्काच बसला! आमची प्रतिक्रिया लगेच अविश्वासाची होती — “ख्रिस्ती लोकांनी खोटे बोलता कामा नये, अनीतिमानतेने वागू नये आणि त्यांच्यात सचोटीच्या वागणूकीचा अभाव आढळता कामा नये!”

आमची भेट अशा पाळकांशी आणि देवाच्या सेवकांशी सुद्धा झाली जे अप्रामाणिक होते. मी अशा अनेक घटनांविषयी सांगू शकतो — मी ‘उत्तम’ रिपोर्टविषयी ऐकले आणि त्यांच्या ‘कामाची’ छायाचित्रेदेखील पाहिली. कधीकधी असा देखील प्रसंग घडून आला की त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवून मी हजारो रुपयांचे चेक लिहून दिले आहेत. मग शेवटी माझ्या लक्षात आले की आपण लोकांच्या शब्दांवर विश्वास ठेवता कामा नये. मग आम्ही अशा ठिकाणी येऊन पोहोचलो जेथे खरोखर खात्री होईपर्यंत आम्हाला लोकांवर विश्वासच होईना! आम्हाला पुन्हा विचार करावा लागत असे. आम्ही अशा स्थितीत येऊन पोहचलो जेथे लोकांवर पूर्णपणे विश्वास करण्यापूर्वी

आम्हास लोकांची तपासणी केली पाहिजे.

ह्या लेखाची उद्दिष्ट्ये देवाचे लोक म्हणून आमच्याठायी खालील गोष्टींस प्रोत्साहन देणे आहे :

- सचोटीप्रत वचनबद्धता.
- प्रामाणिकप्रत वचनबद्धता.
- आमच्या बोलण्यात, ज्याप्रकारे आपण आपला उद्योग चालवितो, नोकरी करतो, आणि इतर सर्व गोष्टी करतो त्यांत सात्विकता आणि नीतिमत्व याप्रत वचनबद्धता. आमची प्रवृत्ती ही असली पाहिजे : "त्यासाठी आम्हाला वाटेल ती कीमत का द्यावी लागेना, तरीही आम्ही नीतिमत्वाप्रत वचनबद्ध राहू."
- सचोटीने चालण्यात जे आशीर्वाद आहेत त्याबाबत जागरूकता. आम्हाला हे कळत नाही की जेव्हा आम्ही सोयिस्कररित्या खोटे बोलण्याचा पर्याय निवडतो, तेव्हा देवाने आम्हास जे आशीर्वाद दिले आहेत त्यांस आम्ही मुकतो.
- देवाप्रत अधीनता आणि आम्हास आपल्या नियंत्रणात ठेवणारी बंधने तोडण्याची त्यांस मुभा देणे, यासाठी की या क्षेत्रात आमच्यात बदल घडून यावा. आमच्यापैकी काही लोकांस असे आढळून येते की ते बंधनात आहेत आणि सत्य बोलण्याची इच्छा असली तरीही खरोखर ते बोलू शकत

नाहीत. जर असे असेल तर, हे शक्य आहे की आम्हाला लबाडीपासून आणि फसवणूक करणाऱ्या आत्म्यांपासून मुक्त होण्याची गरज आहे. ज्याविषयी बायबल सांगते.

> आमच्यापैकी प्रत्येकास अशा ठिकाणी येऊन पोहोचण्याची गरज आहे जेथे आपण प्रामाणिकपणा, सचोटी आणि नीतिमत्व यांस पूर्णपणे समर्पित राहू.

# १

# प्रामाणिकपणाविषयी सूचना

बायबल आम्हास सांगते की आम्ही सचोटीने, सरळपणे आणि प्रामाणिकपणे चालावे.

**परमेश्वर ज्यांचा द्वेष करितो अशा सहा गोष्टी आहेत; नव्हे, त्याला अशा सात गोष्टींचा वीट आहे; उन्मत्त दृष्टी, लबाड बोलणारी जिव्हा, निर्दोष रक्त पाडणारे हात, दुष्ट योजना करणारे अंतकरण, दुष्कर्म करण्यास त्वरेने धावणारे पाय, लबाड बोलणारा खोटा साक्षी, व भावाभावात वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य, ह्या त्या होत** (नीतिसूत्रे ६:१६—१९).

नीतिसूत्रे ६:१६—१९ अशा गोष्टींची यादी मांडते ज्याचा देवाला वीट आहे. यात लबाड बोलणे, दुष्ट योजना आखणे, दुष्कर्म करणे, खोटी साक्ष देणे आणि वैमनस्य उत्पन्न करणे या गोष्टींचा समावेश आहे. उदाहरणार्थ, जर कंपनीचा अकाऊंटंट खोटा रिपोर्ट सादर करण्यासाठी आकड्यांत हेराफेरी करीत असेल, तर ही दुष्ट योजना आखणे होय. काहीही पाहिले नसतांना जर आपण म्हणत असू की आम्ही पाहिले आहे, तर आपण खोटी साक्ष देणारे ठरू ज्याचा देवाला वीट येतो.

**असत्य वाणी परमेश्वराला वीट आणिते, परंतु सत्याने वागणारे त्यास आनंद देतात** (नीतिसूत्रे १२:२२).

देव “खोटे बोलणाऱ्या ओठांकडे” केवळ चारित्र्याचा दोष म्हणून दुर्लक्ष करून क्षमा करीत नाही. याचा “देवाला वीट आहे” ही गोष्ट प्रकट करते की तो ते मुळीच सहन करीत नाही. दुसरीकडे जे सत्याने वागतात, त्यांच्यावर तो प्रसन्न होतो. जर आम्ही आपल्या नोकरीत, आपल्या पैश्यांच्या व्यवहारात आणि आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिक राहण्याप्रत समर्पित असू तर बायबल म्हणते, आम्ही “त्यास आनंद देतो. ” जेव्हा आम्ही सत्याने वागतो तेव्हा देव अत्यंत प्रसन्न होतो. समजा आमचा अधिकारी आम्हास असे कार्य करावयास सांगतो ज्यात खरेपणा नसतो, हे ठरविणे आमच्या हाती आहे की आम्ही आमच्या देवास प्रसन्न करणार आहोत अथवा अधिकाऱ्यास प्रसन्न करणार आहोत. निवड पूर्णपणे आमची आहे. आम्हास पूर्णपणे प्रामाणिकपणाप्रत, सचोटीप्रत समर्पित असले पाहिजे.

**तुझ्या लोकांपैकी जो कंगाल असेल त्याच्या मुकदम्याचा निवाडा विपरीत करू नको. खोट्या मुकदम्यापासून दूर राहा; निरपराधी व नीतिमान् ह्यांचा वध करू नको, कारण दुष्टाला मी नीतिमान् ठरविणार नाही. लाच घेऊ नको कारण लाच डोळसांना आंधळे करिते आणि नीतिमानांच्या म्हणण्याचा विपर्यास करिते (निर्गम २३:६—८).**

ही मजेदार गोष्ट आहे की कधी कधी आम्ही असा विचार करतो की आपण लबाडीचा आश्रय घेऊन सत्याचा बचाव करू शकतो! हे खरोखर अनावश्यक आहे कारण सत्य स्वत:चा बचाव करील आणि आम्हाला आपल्या खोटेपणाच्या मदतीने

त्याचा बचाव करण्याची गरज भासत नाही. कामाच्या ठिकाणी ह्या परिस्थितीचा विचार करा जी कित्येकदा घडते — एखादा सोबती आपणास फोन करतो आणि विनंती करतो की आपण अधिकाऱ्यांस कळवावे की त्याला बरे नाही, खरे पाहता तो अगदी चांगला आहे आणि आणखी काहीतरी करण्यासाठी सुट्टी घेण्याचा बेत आखत आहे. आपण असे करण्यास सहमत होता आणि अधिकाऱ्यांशी खोटे बोलता. आपण असा विचार करू शकता की आपल्या मित्राची मदत केल्याने आपण काहीतरी चांगले करीत आहा, परंतु खरे म्हणजे आपण खोटे बोलत आहा कारण आपणास माहीत आहे की आपला मित्र आजारी नाही परंतु बाहेर कुठल्यातरी खाजगी कामाने गेला आहे. सत्य हे आहे की त्याच्या खोटेपणात आपण त्याला साथ दिली आहे. निर्गम २३:७ आपणास सांगते की "खोट्या मुकदम्यापासून दूर राहा." अशा गोष्टींत सहभागी होऊ नका. आपल्या सोबत्यास हे सांगण्याचे धैर्य बाळगा की त्याने अधिकाऱ्यांशी सत्य बोलावे. कधीकधी आपण अशा गोष्टींत सहभागी होतो कारण आपणास वाटते की आपण आपल्या मित्रांवर कृपा करीत आहोत. नाही, आपण आपल्या मित्रावर कृपा करीत नाही!

**तू आपली जीभ दुर्भाषणापासून व आपले ओठ कपटी भाषणांपासून आवर** (स्त्रोतसंहिता ३४:१३).

आम्हाला आपली जीभ आवरण्यास सांगण्यात आले आहे. लक्षात ठेवा की आमच्या जीभा आमच्या नियंत्रणात आहेत,

आणि सैतानाच्या नियंत्रणात नाही. काही लोक असे म्हणून सबब सांगतात, “सैतानाने मला खोटे बोलावयास लावले.” सत्य हे आहे की खोटे आपण बोलला आहात. आता काही लोक असे असतील जे बंधनात आहे, जेथे सैतान त्यांच्यावर इतका प्रभाव टाकत आहे की ते अनियंत्रितपणे खोटे बोलतात, पण हे बंधन येशूच्या नावात तोडता येते. तथापि, शेवटी आमच्या जीभा आमच्या ताब्यात आहेत. आपण सैतानाला, आपल्या आईवडिलांना, आपल्या नातेवाईकांना अथवा ज्या वातावरणात आपण लहानाचे मोठे झालो त्याला दोष देता कामा नये, कारण आम्हाला खोटे बोलण्याची सवय आहे. आम्हाला आपल्या जीभेवर नियंत्रण ठेवण्यास शिकले पाहिजे.

खोटे बोलतांना दुसरी सबब जी आपण सांगतो ती आहे, “देव माझे अंत:करण जाणतो. जरी मी थोडेसे खोटे बोललो, तरीही मी खरोखर अत्यंत प्रामाणिक आहे.”

आणि आम्ही ह्या गोष्टींची पर्वा करीत नाही की याचा पडसाद लोकांवर कसा पडतो. परंतु नवा करार आम्हाला शिकवितो की आम्हाला केवळ परमेश्वराच्या दृष्टीने नव्हे, तर मनुष्याच्या दृष्टीत देखील प्रामाणिक राहण्याची गरज आहे. केवळ हे म्हणणे पुरेसे नाही, “देव मला पाहतो आणि माझे अंत:करण जाणतो.” बायबल हे सुद्धा म्हणते की आम्हाला

जे स्वार्थाने जन्मले आहे त्याचा देव अभिषेक करू शकत नाही.

मनुष्यांसमोर प्रामाणिक राहिले पाहिजे. वाइटाबद्दल वाईट अशी कोणाची फेड करू नका. सर्व मनुष्यांच्या दृष्टीने जे सात्विक ते करण्याकडे लक्ष ठेवा (रोम १२:१७, KJV). उदाहरणार्थ, जर व्यक्तीला फार गरज असेल, म्हणून तो आणखी कोणाची वस्तु चोरू शकत नाही आणि ह्या सबबीचा उपयोग करू शकत नाही की, “देव मला जाणतो आणि माझी परिस्थिती जाणतो. मी सामान्यत: हे केले नसते, पण मी हे असे केले कारण मी फार गरजू आहे.” गरज फार मोठी आहे म्हणून देव चोरी माफ करणार नाही आणि मनुष्यदेखील ती सबब स्वीकार करणार नाही!

**आम्ही ‘प्रभुच्या दृष्टीने जे मान्य,’ इतकेच नव्हे तर ‘मनुष्यांच्याही’ दृष्टीने जे मान्य, ते करण्याची खबरदारी घेतो** (२ करिंथ. ८:२१).

पौल स्पष्टीकरण मांडतो की कशाप्रकारे त्याला देण्यात आलेली देणगी तो गोळा करीत फिरला आणि मंडळीद्वारे त्याला देण्यात आलेला पैसा त्याने कसा हाताळला. त्याने अत्यंत गंभीरपणे आचरण केले. त्याने देवाप्रत आणि ज्या लोकांनी त्याच्या हाती पैसा सोपविला होता त्यांच्याप्रत उत्तरदायित्वाच्या भावनेने पैश्याचा व्यवहार केला. देवाची इच्छा होती की त्याचे सर्व व्यवहार केवळ देवासमोरच नव्हे, तर मनुष्यांसमोरसुद्धा प्रामाणिकपणाचे असावेत.

म्हणून ऑल पीपल्स चर्चमध्ये, आम्ही आपली सर्व हिशोबाची पुस्तके सुव्यवस्थित परिस्थितीत राखण्याचा आटोकाट प्रयत्न

करतो. आम्ही हा देखील आग्रह करतो की आमची सर्व बिले आणि आर्थिक व्यवहाराची विवरणे राखावीत. यासाठी की जर कोणी आम्हाला प्रश्न केला, तर आमच्याजवळ सर्व दस्तावेज बरोबर असावेत. आम्हाला अतिरिक्त प्रयत्न करण्याची गरज आहे, यासाठी की आपण देवास आणि माणसास हिशोब देण्याच्या स्थितीत असावे.

**म्हणून लबाडी सोडून देऊन तुम्ही प्रत्येक जण आपापल्या शेजाऱ्यांबरोबर खरे बोला, कारण आपण एकमेकांचे अवयव आहो** (इफिस ४:२५).

आम्ही चर्चमध्ये एकमेकांस कशाप्रकारे “देवाची स्तुती असो!” असे म्हणतो आणि तरीसुद्धा एकमेकांशी खोटे बोलतो, हे खरोखर विचित्रपणाचे आहे. बायबल आम्हास सांगते की आपण खोटेपणा सोडून द्यावा आणि एकमेकांशी खरे बोलावे — आम्ही सर्व ख्रिस्ताच्या मंडळीचे आहोत आणि आम्हाला एकमेकांशी सत्य बोलण्याची गरज आहे.

**परराष्ट्रीयांत आपले आचरण चांगले ठेवा, ह्यासाठी की, ज्याविषयी ते तुम्हास दुष्कर्मी समजून तुम्हाविरुद्ध बोलतात त्याविषयी त्यांनी तुमची सत्कृत्ये पाहून ‘समाचाराच्या दिवशी’ देवाचे गौरव करावे** (१ पेत्र २:१२).

जगातील लोक आमचे निरीक्षण करीत असतांनाही, त्यांनी आम्हास प्रामाणिक म्हणून ओळखले पाहिजे. आम्हाला सचोटीचा आणि प्रामाणिकपणाचा हा स्तर राखला पाहिजे कारण जेव्हा ते

आमच्याकडे पाहतील, तेव्हा त्यांच्याजवळ आमच्याकडे बोट दाखविण्यास कुठलेही कारण नसावे.

***देव "खोटे बोलणाऱ्या ओठांकडे" केवळ चारित्र्याचा दोष म्हणून दुर्लक्ष करून क्षमा करीत नाही. याचा "देवाला वीट आहे" ही गोष्ट प्रकट करते की तो ते मुळीच सहन करीत नाही.***

# २

# देव आमच्या प्रामाणिकपणाचे (अथवा आमच्यात तो आहे किंवा नाही याचे!) परीक्षण करतो आणि जाणतो

देव आमच्या प्रामाणिकपणाचे परीक्षण करतो आणि जाणतो. आमच्या प्रामाणिकपणाची पातळी कदाचित आमच्या पाळकास कधीही कळणार नाही. आम्ही आपल्या नोकरीसाठी आपला गोषवारा तयार करीत असतांना त्यात खोटी माहिती सांगत असू आणि रविवारच्या पहाटे देवळात जाऊन देवाची उपासना करीत असू, पण आमच्या पाळकांना त्याविषयी कधीही कळणार नाही. पण देव ते जाणतो. तो आमचा प्रामाणिकपणा अथवा त्याची उणीव जाणतो. राजा दावीद म्हणतो, **“माझ्या नीतिमत्त्वाप्रमाणे व माझ्या ठायी असलेल्या सात्विकतेप्रमाणे, हे परमेश्वरा, माझा न्याय कर”** (स्त्रोतसंहिता ७:८ब).

दावीद पवित्र शास्त्रात प्रार्थना करतो : **“हे परमेश्वरा, माझा न्याय कर, कारण मी सात्विकपणे वागलो आहे, आणि परमेश्वरावर भरवंसा ठेविला आहे; मी घसरणार नाही. हे परमेश्वरा, मला कसास लाव, माझी पारख**

**कर; माझे अंतर्याम व माझे हृदय पडताळून पाहा"** (स्त्रोतसंहिता २६:१,२). किती गंभीर प्रार्थना! कारण दावीद सचोटीने चालत असे, तो प्रार्थनेच्या स्थितीत होता – की देवाने त्याचा न्याय करावा. बरेचदा आपण म्हणतो, "जर मी माझ्या अधिकाऱ्यास सांगितले की मी खोटे बोलणार नाही, तर मला नोकरी गमवावी लागेल" जर आपण अशा स्थितीत आहात जेथे आपणास आपल्या सात्विकपणामुळे नोकरी गमवावी लागत असेल तर देवाची स्तुती असो, कारण मग आपण दावीदासमान प्रार्थना करू शकता आणि प्रभुला विनंती करू शकता की त्याने आपला न्याय करावा.

तथापि, जर आपण प्रामाणिकपणे वागत नसू, तर आपण देवाला विनंती करू शकत नाही की त्याने आपला न्याय करावा. स्त्रोतलेखकाप्रमाणे आपण हे म्हणावयास समर्थ असले पाहिजे की आम्ही सात्विकतेने वागलो, प्रामाणिकपणे काम केले आणि जे योग्य आहे असे आम्ही जाणत होतो ते आम्ही केले, आणि मग देवास विनंती करावी की त्याने आमची युद्धे लढावी.

> **परमेश्वर म्हणतो, मी जवळचा मात्र देव आहे आणि दूरचा देव नव्हे काय? परमेश्वर म्हणतो, माझ्या दृष्टीस पडणार नाही अशा गुप्त स्थळी कोणास लपता येईल काय? मी आकाश व पृथ्वी व्यापून राहत नाही काय? असे परमेश्वर म्हणतो** (यिर्मया २३:२३,२४).

देव पवित्र शास्त्रात एक मजेदार प्रश्न विचारतो – "माझ्या

दृष्टीस पडणार नाही अशा गुप्त स्थळी कोणास लपता येईल काय?" (यिर्मया २३:२४अ). आम्ही स्वत:स लपवू शकत नाही आणि अप्रामाणिकपणाची कामे करू शकत नाही, आणि क्षणभर असे ठरवू शकत नाही की देव आम्हास पाहत नाही. अर्थात कोणीही मनुष्य आम्हास पाहत नसावा पण पृथ्वीवर अशी कुठलीही गुप्त जागा नाही जेथे आम्ही जाऊ शकतो, जेथे देव आम्हास पाहू शकत नाही. आम्ही आपल्या कॅम्प्यूटरसमोर बसून आपल्या मासिक अहवालात सर्वप्रकारच्या खोट्या गोष्टी लिहित असू आणि कोणीही काही जाणणार नाही. परंतु लक्षात ठेवा देव बघत आहे. तो आमच्या अंत:करणाचा प्रामाणिकपणा जाणतो आणि त्याचे परीक्षण करतो.

**आणि त्याच्या दृष्टीला अदृष्य अशी कोणतीही निर्मिती नाही, तर ज्याच्याबरोबर आपला संबंध आहे त्याच्या दृष्टीला सर्व उघडे व प्रगट केलेले आहे** (इब्री ४:१३).

आम्ही देवापासून मुळीच काहीही लपवू शकत नाही. आम्हाला अशा ठिकाणी येण्याची गरज आहे जेथे आमच्या मनात देवाचे पवित्र भय असेल जे आम्हास सात्विकतेने आणि प्रामाणिकतेत जगण्यात आमची मदत करील.

***आम्ही देवापासून मुळीच काहीही लपवू शकत नाही.***

# ३

# तरी आपण आपल्या प्रामाणिकपणाविषयी तडजोड का करतो?

आमच्यापैकी बहुतेक लोक आम्ही आतापर्यंत वाचलेल्या सर्व गोष्टींशी परिचित आहेत. बालपणापासून, आम्हाला शिकविण्यात आले आहे की खोटे बोलणे वाईट आहे, आम्ही प्रामाणिक असले पहिजे, सात्विकतेने चालले पाहिजे, इत्यादी. आतापर्यंत उल्लेख केलेल्या पवित्र शास्त्र वचनांशी आम्ही परिचित असू शकतो. आमच्या बायबलमध्ये आम्ही ही वचने रेखांकितदेखील केली असतील!

परंतु आम्हाला स्वत:स हे प्रश्न विचारण्याची गरज आहे :

- आपण अद्याप खोटे का बोलतो?
- जरी आम्ही बऱ्याच काळपासून ख्रिस्ती असलो तरीही आम्ही आमच्या कामात, सेवेत अप्रामाणिक आहोत, असे का? बरेचदा आम्ही लोकांस सांगतो की आम्ही एखाद्या गोष्टीसाठी पैसा उभा करीत आहोत आणि तो पैसा दुसऱ्याच कामासाठी खर्च करतो.
- देवाचे लोक ज्यांना ह्या सर्व गोष्टी माहीत आहेत आणि

ज्यांनी पवित्र शास्त्रात या सर्व गोष्टींविषयी लिहिले आहे, ते अद्याप अप्रामाणिक का आहेत?

आम्ही अद्याप अप्रामाणिकपणे का वागत आहो याची कारणे आहेत जी आम्हास आमच्या जीवनात सचोटी, प्रामाणिकपणा आणि सात्विकपणा राखून ठेवण्यापासून अडखळण आणतात. येथे काही शक्य कारणे आहेत :

## देवाचे खरे भय नाही — देवाच्या कृपेस सहज समजणे

आम्ही कधीकधी देवाची क्षमा, कृपा, स्थिर प्रीती आणि चांगुलपणा याविषयी बोलणाऱ्या वचनांशी इतके परिचित होऊन जातो की आपण त्यास फारसे महत्वच देत नाही. आम्हाला वाटते की आम्ही खोटे बोलत राहिलो आणि अप्रामाणिक राहिलो, तरीही देव आम्हास क्षमा करील. आमच्या जीवनांत देवाची खरी भीती नसते. “दया व सत्य यांच्या योगाने पापाचे क्षालन होते, आणि परमेश्वराचे भय बाळगल्याने मनुष्ये दुष्कर्मांपासून दूर राहतात” (नीतिसूत्रे १६:६). देवाची खरी भीतीच व्यक्तीला वाईटापासून दूर ठेवील. आम्ही त्याची इतकी भीती बाळगली पाहिजे आणि इतका मान राखला पाहिजे की आम्ही पाप करता कामा नये — अप्रामणिकपणा, लबाडी आणि अनीतिमानता. जेव्हा देवाची भीती नसते, तेव्हा जी गोष्ट आम्हाला प्रसन्न करेल ती आम्ही करू. हे खरे आहे की आम्ही देवाच्या कृपेवर अवलंबून राहतो, पण त्याचवेळी आमच्या अंत:करणात देवाचे भय असले पाहिजे.

ही खरोखर दुखाची गोष्ट आहे की काही सेवक आणि देवाचे प्रचारक त्यांच्या जीवनात देवाची भीती बाळगत नाहीत आणि जेव्हा ते पुलपिटवरून बाहेर पडतात, तेव्हा ते खोटे बोलण्यास आणि सर्व प्रकारची वाईट कामे करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. जेव्हा देवाच्या सेवकांच्या मनात देवाची भीती नसते, तेव्हा आम्ही लोकांस देवाची भीती राखणे कसे शिकविणार? आम्हाला अशा ठिकाणी येऊन पोहोचावयाचे आहे जेथे आमच्या मनात देवाची भीती असेल.

## मनुष्याचे भय

कधीकधी आम्ही लोकांच्या भीतीमुळे खोटे बोलतो — जर आम्ही त्यांस सत्य सांगितले तर ते कशी प्रतिक्रिया व्यक्त करतील याची भीती आम्हास असते. आम्हास मनुष्याच्या भीतीवर जय मिळविण्याची गरज आहे! आम्ही इतके धैर्यवान असले पाहिजे की आम्ही कोणाशीही का व्यवहार करीत असेना, आम्ही सत्य बोलले पाहिजे आणि नीतिमत्वाने वागले पाहिजे.

## भीतीचे परिणाम

“जर मी खोटे बोलून ह्या परिस्थितीतून बाहेर पडलो नाही, तर मी येथेच खितपत पडणार, म्हणून बाहेर पडण्यासाठी खोटे बोललेले बरे.” ही खोटे बोलण्याची दुसरी सबब लोकांजवळ असते. आम्ही इतके धैर्यवान असले पाहिजे की वाटेल तो परिणाम झाला तरीही आम्ही सत्याने वागले पाहिजे. लक्षात

ठेवा, जेव्हा आम्ही प्रामाणिकपणे वागतो, तेव्हा देव आमच्या पक्षास उभा राहतो!

## प्रतिष्ठा / अहंकार

कधीकधी आमची प्रतिष्ठा आणि अहंकार धोक्यात येतो, म्हणून आम्ही खोटे बोलतो कारण आम्ही आपली प्रतिष्ठा आणि अहंकार याचे रक्षण करू इच्छितो. उदाहरणार्थ, जेव्हा कोणी आम्हास विचारतो की आम्ही आमच्या परीक्षेत पास झालो का, तेव्हा आम्ही जरी ते खरे नसले, तरीही 'होय' म्हणतो.

## विश्वासाने वागण्याऐवजी आम्ही सोयीने जगतो

आम्ही विश्वासाने जगण्याऐवजी सोयीने जगण्याची प्रवृत्ती बाळगतो कारण विश्वासाने जगण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतात. जेव्हा आम्हाला विश्वास असतो की आम्ही सर्वदा सत्य बोलले पाहिजे, तेव्हा आम्ही सत्य बोलले पाहिजे, मग त्याची कीमत काहीही का असेना. सोय म्हणते : "जर सोपे असेल, तर मी सत्य बोलेन; जर कठीण असेल, तर मी खोटे बोलून त्यातून मार्ग बाहेर काढील." कृपा करून स्वत:स सांगा की आपण विश्वासाने **जगाल!** आम्ही विश्वासाने जगले पाहिजे, सोयीने नव्हे. आम्हास ही खात्री असली पाहिजे की आम्ही विश्वास, सत्य आणि प्रामाणिकपणा यात चालणारे स्त्री पुरुष होण्याची गरज आहे.

## अप्रसन्न करण्याची/दु:खी करण्याची भीती

कधीकधी लोक खोटे बोलतात कारण ज्या व्यक्तीशी ते बोलत आहेत त्याला ते दुखावू इच्छित नाहीत. खोटे ते खोटे आहेत — मग ते आपण चांगल्या हेतूने का बोलले असेना.

## लपविण्याद्वारे चांगले बनण्याचा प्रयत्न करणे

कधीकधी लोक आपल्या मित्राची चूक लपविण्याचा प्रयत्न करतात. खोटे ते खोटे आहे — मग आपण कितीही प्रामाणिक का असेना! हे लक्षात ठेवा : सत्य स्वत:च्या पक्षाने उभे राहू शकते. सत्याला स्वत:चा बचाव करण्यासाठी खोटेपणाची गरज भासत नाही!

***देवाची खरी भीतीच व्यक्तीला वाईटापासून दूर ठेवील. आम्ही त्याची इतकी भीती बाळगली पाहिजे आणि इतका मान राखला पाहिजे की आम्ही पाप करता कामा नये — अप्रामणिकपणा, लबाडी आणि अनीतिमानता. जेव्हा देवाची भीती नसते, तेव्हा जी गोष्ट आम्हाला प्रसन्न करेल ती आम्ही करू.***

# ४.

# अप्रामाणिकपणाचे परिणाम

प्रामाणिकबाबत आम्ही तडजोड करतो याचे दुसरे कारण हे आहे की आम्हाला त्याच्या परिणामांचे गांभीर्य खरोखर कळत नाही. अनेकदा, आम्हाला वाटते की जर आम्ही जाऊन देवास क्षमा मागितली, तर सर्व काही ठीक होईल. अर्थात देव आम्हाला क्षमा करतो पण आम्हाला आपले परिणाम तरीही भोगावे लागतात. देव सर्व परिणाम बदलणार नाही. आम्ही जे बी पेरले आहे त्याच्या परिणामांची आम्हाला कापणी करावी लागेल. आपणास अप्रामाणिकपणाचे परिणाम पूर्णपणे समजण्याची गरज आहे. आपण काही शास्त्रवचने पाहू या :

> **“खोटी साक्ष देणाऱ्याला शिक्षा चुकणार नाही; लबाड बोलणारा सुटणार नाही”** (नीतिसूत्रे १९:५).

अनेकदा, आम्ही बचावण्यासाठी खोटेपणाचा उपयोग करतो. पण आम्हाला हे कळत नाही की देवाचे वचन म्हणते : “खोटे बोलणारा त्यातून बचावू शकत नाही” (नीतिसूत्रे १९:५ब) आम्ही खोटे बोलून एखाद्या परिस्थितीतून बाहेर पडल्याबद्दल आनंदित होत असू, पण आम्हाला हे कळत नाही की जर आम्ही पश्चाताप केला नाही आणि आमच्या सभोवतालच्या

गोष्टी योग्यपणे हाताळीत नाही, तर लवकरच आम्ही त्यात फसू.

- **आम्ही स्वत:ला मोठ्या सापळ्यात फसवित आहोत हे न जाणता आपण बरेचदा कठीण परिस्थितीतून पळ काढण्यासाठी खोटे बोलतो!**

**लबाडीची भाकरी मनुष्यास गोड लागते, पण मग त्याच्या तोंडात माती पडते** (नीतिसूत्रे २०:१७).

लबाडीमुळे मिळविलेली भाकर आरंभी गोड वाटते, पण जर ती लबाडीने मिळवली असेल, तर त्याच्या "तोंड़ात माती पडेल" (नीतिसूत्रे २०:१७ब). जेव्हा एखाद्या व्यक्ती केवळ सहा महिन्यांचा अनुभव असतांना त्याच्या गोषवाऱ्यात लिहितो की त्याला सहा वर्षांचा अनुभव आहे, तेव्हा ही लबाडी झाली! अप्रामाणिकपणे कमाविलेला पैसा प्रारंभी गोड वाटत असेल, पण नंतर तो तोंडात मातीसारखा ठरेल. नीतिसूत्रे २१:६ देखील हे सत्य मांडते – "असत्य जिव्हेने मिळविलेले धन इकडेतिकडे उडून जाणाऱ्या वाफेसारखे आहे; मृत्यूच्या मागे लागणारे त्याला बोलावितात." अप्रामाणिकपणाने मिळविलेली संपत्ती मृत्यू आणि विनाशाकडे नेते, आणि ती संपत्ती लवकरच अदृश्य होईल.

- **अप्रामाणिकपणा "त्वरित आणि सोपा" मार्ग वाटत असेल, पण त्याचा परिणाम लवकरच आमचा पाठपुरावा करील!**

**“अधिपति खोट्या गोष्टीला कान देणारा असला, तर त्याचे सर्व सेवक दुष्ट बनतात”** (नीतिसूत्रे २९:१२).

- **जेव्हा नेतृत्वपदावरील व्यक्ती अप्रामाणिक असतो, तेव्हा त्याच्या अधीन असलेले सर्व लोक त्या मार्गात त्याचे अनुसरण करतात.**

**“तुम्ही आपणासाठी धार्मिकतेची पेरणी करा म्हणजे प्रेमाची कापणी कराल; पडीत जमीन नांगरून काढा; कारण परमेश्वराने येऊन तुम्हांवर धार्मिकतेची वृष्टी करावी याकरिता त्याला शरण जाण्याचा हा समय आहे. तुम्ही दुष्टतेच्या पेरणीसाठी नांगरिले; अधर्माची कापणी केली, तुम्ही लबाडीचे फळ खाल्ले; कारण तू आपल्या मार्गावर भिस्त ठेविली, आपल्या पराक्रमी वीरसमूहावर भाव ठेविला”** (होशेय १०:१२,१३).

होशेय १०:१२—१३ एक मजेदार सत्य मांडते. जितक्यांदा आम्ही खोटे बोलतो, तितक्यांदा आम्ही अधर्माची पेरणी करतो, दुष्टतेची पेरणी करतो आणि लवकरच आम्हाला आमच्या खोटेपणाची फळे खावी लागतील. खोटेपणा आपले फळ उपजवील आणि आम्हाला ते खावे लागेल. म्हणून आम्हाला हे समजले पाहिजे की आमच्या खोटेपणाचा आणि अप्रामाणिकतेचा परिणाम आहे.

- **“खोटेपणाचे एक फळ” आहे जे आम्ही पेरीत असलेल्या प्रत्येक खोटेपणासाठी आम्ही प्राप्त करणार आहोत.**

**“तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहा आणि तुमच्या**

**बापाच्या वासनांप्रमाणे करावयास इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वत:चे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे”** (योहान ८:४४).

- **जेव्हा आम्ही खोटे बोलतो, तेव्हा आम्ही सैतानाच्या कामात सहभागी होतो.**

बायबल म्हणते की खोटे बोलणारे अर्थात लबाडी करणारे अधोलोकात टाकले जातील — जो अत्यंत गंभीर परिणाम आहे.

**परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, ‘खून करणारे,’ जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक, व सर्व लबाड माणसे ह्यांच्या वाट्यास अग्नीचे व गंधकाचे’ सरोवर येईल; हेच ते दुसरे मरण आहे** (प्रकटीकरण २१:८).

बायबल म्हणते की विश्वासाने कृपेद्वारे आमचे तारण झाले आहे. प्रभु येशू ख्रिस्ताच्या ज्ञानाप्रत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे तारण होईल आणि येशू ख्रिस्ताठायी कृपा, दया, माफी, क्षमा आणि तारण आहे. तथापि एक गंभीर परिणाम ज्याचा देवाने विशिष्टरित्या उल्लेख केला तो आहे — जर आपण लबाड अथवा खोटे बोलणारे असू, तर आपणास अधोलोकात पाठविले जाईल (प्रकटीकरण २१). सैतान हा लबाडांचा पिता आहे आणि त्याच्याठायी मुळीच सत्य नाही (योहान ८:४४), म्हणून देव लबाडी करणाऱ्यांस म्हणेल, “जा, जर खोटे बोलत

राहिलात, तर आपल्या पित्यासोबत राहा!” खोटेपणाचा आणि सत्य न बोलण्याचा असा गंभीर परिणाम आहे! आम्हाला हे समजण्याची गरज आहे की अप्रामाणिकपणाचे परिणाम आहेत — वर्तमान जगात आणि येणाऱ्या जगातसुद्धा. यामुळे आमच्या मनात पवित्र भय उत्पन्न झाले पाहिजे ज्यामुळे आम्ही असे म्हणावयास प्रवृत्त व्हावे की, “देवा, मी दुष्टपणाची पेरणी करू इच्छित नाही. मी माझ्या लबाडीची फळे खाऊ इच्छित नाही. मी पाप आणि दुष्टपणा यांची पेरणी करू इच्छित नाही.”

- **अंतिम परिणाम — खोटे बोलणारे अधोलोकात जातात!**

## अप्रामाणिकपणाचे परिणाम

- आम्ही स्वत:ला मोठ्या सापळ्यात फसवीत आहोत हे न जाणता आपण बरेचदा कठीण परिस्थितीतून पळ काढण्यासाठी बरेचदा खोटे बोलतो!
- अप्रामाणिकपणा "त्वरित आणि सोपा" मार्ग वाटत असेल, पण त्याचा परिणाम लवकरच आमचा पाठपुरावा करील!
- जेव्हा नेतृत्वपदावरील व्यक्ती अप्रामाणिक असतो, तेव्हा त्याच्या अधीन असलेले सर्व लोक त्या मार्गात त्याचे अनुसरण करतात.
- "खोटेपणाचे एक फळ" आहे जे आम्ही करीत असलेल्या प्रत्येक खोटेपणासाठी आम्ही प्राप्त करणार आहोत.
- जेव्हा आम्ही खोटे बोलतो, तेव्हा आम्ही सैतानाच्या कामात सहभागी होतो.
- अंतिम परिणाम — खोटे बोलणारे अधोलोकात जातात!

# ५

# सरळ (प्रामाणिक) माणसाचे आशीर्वाद

जे लोक सात्विकतेने, नीतिमत्वाने आणि सचोटीने वागतात, त्यांच्यासाठी अद्‌भुत आशीर्वाद राखून ठेवण्यात आले आहेत.

## आशीर्वाद आणि कृपा

**कारण तूच नीतिमानाला आशीर्वाद देतोस; हे परमेश्वरा, तू त्याच्याभोवती कवचाप्रमाणे कृपेचे वेष्टन घालितोस** (स्त्रोतसंहिता ५:१२).

समजा, आपण इंटरव्ह्यू द्यावयास जात आहा आणि देवाच्या कृपेसाठी प्रार्थना करीत आहा. बायबल म्हणते की देव नीतिमानावर कृपा करील. जर आपण देत असलेल्या गोषवाऱ्यात खोटी माहिती भरली असेल, तर आपण देवाच्या कृपेविषयी विसरून जावे कारण तो म्हणतो की तो नीतिमानाला आशीर्वाद देतो आणि त्याच्याभोवती कृपेचे वेष्टन घालतो — अनीतिमान आणि अप्रामाणिक लोकांभोवती नाही, पण सात्विकपणे वागणाऱ्या भोवती. म्हणून आम्ही काय केले पाहिजे? म्हणून आपल्या गोषवाऱ्यात लबाडीने "सहा वर्षे" लिहिण्याऐवजी, आपण

खरेपणाने सहा महिन्यांचा अनुभव लिहावा आणि मग धैर्याने देवास सांगावे की सहा वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तीला मिळावी ती नोकरी त्याने आम्हाला द्यावी म्हणून आम्ही त्याच्यावर अवलंबून आहोत.

आपल्या गोषवाऱ्यात चुकीची माहिती लिहिण्याऐवजी असे करणे योग्य ठरेल. जेव्हा आपण नीतिमत्वाने वागतो तेव्हा देव आपली कृपा प्रकट करू शकतो.

## रक्षण आणि उत्तरित प्रार्थना

स्तोत्रकर्ता म्हणतो, सात्विकपण व सरळपण माझे संरक्षण करोत, कारण मी तुझी प्रतीक्षा करीत आहे (स्त्रोतसंहिता २५:२१). हे किती सुरक्षित स्थान आहे — देवास हे सांगता येणे की मी प्रामाणिकपणे व सात्विकतेने वागलो आहे आणि मग असे म्हणणे की आम्हास माहीत आहे की आम्हास संरक्षण लाभेल.

**परमेश्वराचे नेत्र नीतिमानाकडे असतात; त्याचे कान त्यांच्या हाकेकडे असतात** (स्त्रोतसंहिता ३४:१५).

**नीतिमान धावा करितात, तो ऐकून परमेश्वर त्यांना त्यांच्या सर्व संकटातून मुक्त करितो** (स्त्रोतसंहिता ३४:१७).

**नीतिमानाला फार कष्ट होतात; तरी परमेश्वर त्या सर्वातून त्याला सोडवितो** (स्त्रोतसंहिता ३४:१९).

प्रार्थनेचे उत्तर आणि संरक्षण ह्या गोष्टी नीतिमानासाठी

आहेत. जरी आम्हाला फार क्लेश सहावे लागत असले तरीही जेव्हा आम्ही प्रामाणिकपणे वागण्याचा संकल्प करतो, तेव्हा देव आम्हास त्या प्रत्येक कष्टापासून वाचवील.

## स्थायी सुरक्षितता

**सत्याची वाणी सर्वकाळ टिकेल; असत्य बोलणारी जिव्हा केवळ क्षणिक आहे** (नीतिसूत्रे १२:१९).

सत्य कायम राहते! लबाडीने आज तो हेतू पूर्ण होऊ शकतो, पण उद्या ते दिसणार नाही. आपण त्यावर अवलंबून राहू शकत नाही. पहिल्या लबाडीपासून सुटण्यासाठी आपणास कदाचित अनेकदा खोटे बोलावे लागेल. खोटेपणात संरक्षण नाही. तथापि, जेव्हा आपण खरे बोलतो, तेव्हा आम्हाला सुरक्षित वाटते आणि आम्ही सुरक्षित असतो. आम्हाला स्वतःचा बचाव करण्याची गरज नाही कारण सत्य स्वतःचा बचाव करते!

**नीतिमानासाठी प्रकाश व जे सरळ अंतःकरणाचे आहेत त्यांच्यासाठी हर्ष पेरिला आहे** (स्त्रोतसंहिता ९७:११).

## स्पष्टता/प्रकाश

जेव्हा आम्ही नीतिमत्वाने वागतो, तेव्हा आपण अपेक्षा करू शकतो की देवाचा प्रकाश आमच्या मार्गास प्रकाशित करील. जेव्हा आपण नीतिमत्वाने चालत नाही, तेव्हा आपण ही तक्रार करू शकत नाही की मार्ग अंधकारमय आहे आणि भविष्य अंधारलेले आहे.

त्याचा अशाप्रकारे विचार करा — जितक्यांदा आपण खोटे बोलतो, तितक्यांदा आपण आपल्या जीवनातील आमचा प्रकाश “विझवीत आहोत” आणि जितक्यांदा आपण नीतिमत्वाने चालतो तितक्यांदा आपण आमचा मार्ग “प्रकाशित करतो”, आम्ही तो मार्ग स्पष्टपणे पाहू शकतो!

## वारसा

**जो धार्मिक मनुष्य सात्विकपणे चालतो, त्याच्यामागे त्यांची मुले धन्य होतात** (नीतिसूत्रे २०:७).

जेव्हा आपण प्रामाणिकपणे, सचोटीने वागतो, तेव्हा आम्ही आपल्यामागे आपल्या मुलांसाठी आशीर्वाद सोडून जातो. या उलट, जेव्हा आपण प्रामाणिकपणे वागत नाही, तेव्हा आपण आपल्यामागे आपल्या मुलांसाठी शाप सोडून जातो. आम्ही आपल्या मुलांसाठी जो वारसा सोडतो तो याद्वारे ठरविला जातो की आम्ही प्रामाणिकपणे वागत आहोत किंवा नाही.

- बायबल म्हणते की देव नीतिमानावर कृपा करील.
- प्रार्थनेचे उत्तर आणि संरक्षण ह्या गोष्टी नीतिमानासाठी आहेत.
- जेव्हा आपण खरे बोलतो, तेव्हा आम्हाला सुरक्षित वाटते आणि आम्ही सुरक्षित असतो.
- जेव्हा आम्ही नीतिमत्वाने चालतो, तेव्हा आपण अपेक्षा करू शकतो की देवाचा प्रकाश आमच्या मार्गास प्रकाशित करील.
- जेव्हा आपण प्रामाणिकपणे, सचोटीने वागतो, तेव्हा आम्ही आपल्यामागे आपल्या मुलांसाठी आशीर्वाद सोडून जातो.

# ६

# प्रतिसाद — मुक्ति, पश्चाताप, त्याग आणि समर्पण

## लबाडीच्या आत्म्याची बंधने तोडून टाका

आम्हाला अशा ठिकाणाहून जेथे आपण केवळ सत्य जाणतो, निघून अशा ठिकाणी पुढे जाण्याची गरज आहे जेथे आम्ही ते आपल्या जीवनांत लागू करू. आपणापैकी काही जण अशा परिस्थितीत असतील जेथे खोटे बोलणे हा दुसरा स्वभाव आहे आणि आपणास माहीत नाही की आपण ते का करीत आहा. बायबल कमीत कमी दोन ठिकाणी लबाडीच्या आत्म्यांचा उल्लेख करते (१ राजा २२:२२,२३; २ इतिहास १८:२१,२२). याचा अर्थ हा आहे की लबाडीस प्रोत्साहन देणारे आणि लोकांच्या चारित्र्यावर आणि आचरणावर प्रभाव टाकणारे आत्मे आहेत. हे शक्य आहे की आपला नवा जन्म झाला असेल, आपण पवित्र आत्म्याने परिपूर्ण असाल आणि अन्यान्य भाषा बोलत असाल, आणि तरीही आपण लबाडीच्या आत्म्याच्या नियंत्रणात असाल. देवाचा धावा करा आणि बंधनातून मुक्त व्हा!

## खोटेपणा अथवा लबाडीप्रत आपली प्रवृत्ती बदलून टाका

**धार्मिकाला असत्याचा तिटकारा असतो, परंतु दुर्जन अप्रतिष्ठा व निंदा यांस कारण होतो** (नीतिसूत्रे १३:५).

**मी असत्याचा द्वेष करितो व त्याचा वीट मानितो; परंतु तुझे नियमशास्त्र मला प्रिय आहे** (स्त्रोतसंहिता ११९:१६३).

जरी आमच्यापैकी बहुतेकांस माहीत आहे की प्रामाणिकपणा देवासमोर मान्य नाही, तरीही आपण तो सहन करून घेतो, इतरांत आणि स्वत:च्या बाबतीतही. आम्हाला खोटेपणाप्रत सहिष्णूता बाळगण्यापासून अप्रामाणिकपणाच्या कोणत्याही स्वरूपाप्रत पवित्र असहिष्णूतेच्या ठिकाणी येऊन पोहोचले पाहिजे. आम्ही लोकांप्रत असहिष्णू नाही, तर आपण लबाडीच्या आणि अप्रामाणिकपणाच्या सवयींबद्दल असहिष्णू आहोत. आम्हाला खोटेपणाचा म्हणजे लबाडीचा तिटकारा केला पाहिजे. बायबल म्हणते, धार्मिकाला असत्याचा तिटकारा असतो (नीतिसूत्रे १३:५अ). आम्हाला लबाडीप्रत आपली प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे. आम्ही आपल्या जीवनातून लबाडीस दूर करण्यासाठी देवाची कृपा प्राप्त करू या. दु:ख होत असले तरीही सत्य बोलण्याचा आपण संकल्प करू या.

## अप्रामाणिकपणाशी भागीदारी करण्यास नाकार

**कपट करणाऱ्याला माझ्या घरात थारा मिळणार नाही; असत्य बोलणारा माझ्या दृष्टीपुढे टिकणार नाही** (स्त्रोतसंहिता १०१:७).

इतर लोकांच्या अप्रामाणिकपणात वाटेकरी होऊ नका. जेव्हा आपण भागीदारींच्या वेगवेगळ्या स्वरूपांत काम करीत असतो

तेव्हा हे अत्यंत खरे ठरते — कामाच्या ठिकाणी असो किंवा इतरत्र. कधीकधी जेव्हा आपण लोकांना खोटे बोलतांना पाहतो, तेव्हा त्याविरुद्ध बोलण्याऐवजी अथवा त्या खोटेपणास साथ देण्यास नाकार देण्याऐवजी आपण त्याचे भागीदार होतो. आपण असे समजतो की ही त्या व्यक्तीची लबाडी आहे आणि आपण ते बोललो नाही, म्हणून आपण शुद्ध आहोत. सत्य हे आहे की साथीदार म्हणून आपण त्या लबाडीत वाटेकरी झालो आहोत.

मला एका तरूणाची आठवण येते जो आमच्या मंडळीच्या सुरूवातीच्या वर्षी, संपूर्ण एक वर्ष आमच्या सर्व सभांस प्रार्थना सभांस आणि कार्यक्रमांस उपस्थित राहिला. मी खरोखर प्रभावित झालो, पण मी त्याला याविषयी काहीच बोललो नाही. एका रविवारच्या पहाटे, मी “वचनबद्धतेचे सामर्थ्य” या विषयावर उपदेश दिला आणि इतर गोष्टींसोबत प्रामाणिकपणाबाबत वचनबद्ध राहण्याविषयी बोललो. मंडळीच्या सभेच्या शेवटी, हा इसम माझ्याजवळ आला आणि त्याने मला सांगितले की त्याने विदेशात एका बायबल कॉलेजात जाण्यासाठी अर्ज दिला आहे. आणि त्याची मागणी होती की वीसा आणि इतर गरजांसाठी, मी त्याला असे पत्र लिहून द्यावे की मागील एक वर्षांपासून तो ऑल पीपल्स चर्चसोबत काम करीत आहे. त्याचे म्हणणे असे होते की मी हे देखील म्हणावे की आमची मंडळी त्याला बायबल कॉलेजमध्ये अभ्यास करण्यासाठी पाठवीत आहे आणि तो अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर तो येऊन

ह्या मंडळीसोबत काम करील. तथापि, पत्रात ज्या गोष्टी ह्या तरूणाला लिहून घ्यावयाच्या होत्या त्यापैकी एकही गोष्ट खरी नव्हती. मला आश्चर्याचा धक्का बसला! मी त्याला दुसऱ्या दिवशी भेट घ्यावयास सांगितले. जेव्हा आमची भेट झाली, तेव्हा मी त्याला सांगितले की त्याचे अशी विनंती करणे देखील चुकीचे आहे. मी त्याला सांगितले की जे पत्र मी त्याला लिहून देणार आहे त्यात असे लिहिले असेल की त्या विशिष्ट काळात तो नियमितपणे चर्चला येत राहिला आणि मी ते पत्र त्याच्या हाती सोपविले.

मी अगदी हेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण नियमितपणे चर्चला येत असू, अनेक उपदेश ऐकत असू, तरीही खोटे बोलत असू आणि अशा अप्रामाणिक सवयींचा आश्रय घेत असू. जेव्हा आमची भेट अशा लोकांशी घडते, तेव्हा आम्ही विचार करू लागतो की ते कोणत्या मंडळीत जात असावे आणि प्रामाणिकपणाच्या गरजेविषयी त्यांना सांगण्यात आले आहे किंवा नाही. मला ख्रिस्ती भावाबहीणींविषयीच्या अनेक गोष्टी माहीत आहेत जे अप्रामाणिकपणाने आणि अनीतिमानतेने चालतात.

पण हे सर्व काही **आता** बदलले पाहिजे. आम्हाला अप्रामाणिकपणा सहन करण्यापासून पुढे वाढण्याची आणि अशा ठिकाणी येऊन पोहोचण्याची गरज आहे जेथे आपण अप्रामाणिकपणाच्या सर्व स्वरूपांचा तिरस्कार आणि तिटकारा करावा.

- लबाडीच्या आत्म्याची बंधने तोडून टाका
- खोटेपणा अथवा लबाडीप्रत आपली प्रवृत्ती बदलून टाका
- अप्रामाणिकपणाशी भागीदारी करण्यास नाकार

# समर्पणाची प्रार्थना

आपण समर्पणाची प्रार्थना करू या. स्त्रोत लेखकाने अशाप्रकारे प्रार्थना केली — हे परमेश्वरा, माझ्या मुखावर पहारा ठेव; माझ्या वाणीचे द्वार सांभाळ (स्त्रोतसंहिता १४१:३) आणि असत्याचा मार्ग माझ्यापासून दूर कर; करुणा करून तुझे नियमशास्त्र मला दे (स्त्रोतसंहिता ११९:२९).

आपण सचोटी, प्रामाणिकपणा आणि नीतिमत्वाच्या स्थानी देवासमोर येऊ या. आम्हास माहीत आहे की आमचे तारण झाले आहे. आम्हास माहीत आहे की देव करूणा, प्रीती आणि दयेचा परमेश्वर देव आहे, तथापि आपण ही लहान गोष्ट समजता कामा नये. आपण देवाच्या कृपेचा दुरूपयोग करता कामा नये. आम्हाला ह्या क्षेत्रात देवाकडून स्पर्शाची गरज आहे कारण आम्ही वेगवेगळ्या प्रमाणात अप्रामाणिक राहिलो आहोत.

## प्रार्थना

*“हे देवा, माझ्यापासून लबाडीचा मार्ग दूर कर. मजपासून अप्रामाणिकपणा आणि सचोटीची उणीव दूर कर. माझ्यापासून अप्रामाणिकपणाप्रत सहिष्णूता दूर कर आणि माझ्या मनात अप्रामाणिकबद्दल तिटकारा उत्पन्न कर. माझ्या जीवनाची ‘शल्यचिकित्सा’ कर, प्रभु! तुझ्या आत्म्याच्या तलवारीने खोलपर्यंत खोदून काढ आणि मूळापासून ते उपटून टाक. मी आजपर्यंत माझ्या जीवनात अप्रामाणिकपणा सहन केला आहे, पण आता*

*मी तुजजवळ येतो आणि तुला विनंती करतो की त्याचा अंत कर. त्याच्या मुळाशी कुऱ्हाडीचा वार कर आणि ते मूळापासून उपटून टाक. मजपासून खोटेपणा दूर कर, अप्रामाणिकपणा दूर कर आणि अनीतिमानता दूर कर. मी तुजपुढे असा व्यक्ती बनू इच्छितो जो प्रामाणिकपणे चालेल आणि समर्थनासाठी, कृपेसाठी, आशीर्वादासाठी तुजकडे पाहिल. मी असा व्यक्ती बनू इच्छितो जो सत्याने वागेल आणि तुझ्यासाठी आनंदाचे कारण बनेल. लोक मजवर रागावले तरीही हरकत नाही. हे माझ्या देवा, मी तुला प्रसन्न करू इच्छितो, मी तुझ्या आनंदाचे कारण बनू इच्छितो. तू मजविषयी प्रसन्न आणि उत्साही असावे असे मला वाटते. प्रभु, केवळ पवित्र आत्म्याचे शुद्ध करणारे कार्य व सामर्थ्य माझ्या अंतरात्म्यात खोलवर प्रवेश करू शकते आणि माझ्या जीवनातील ह्या दोषाची मुळे उपटून काढू शकते. मी स्वतःला तुझ्या सिंहासनापुढे उभे करतो; माझ्या जीवनात कार्य करण्यासाठी ही वेळ घे. तुझ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने तू हे कर. येशूच्या नावात मी प्रार्थना करतो, आमेन.*

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषत: उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यांस स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यांसाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यांस वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बँक ड्रॉफ्टच्या द्वारे “ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर” च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

Account Name: All Peoples Church
Account Number: 0057213809
IFSC Code: CITI0000004
Bank: Citibank N.A., No. 5, M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

*कृपया लक्षात ठेवा: ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.*

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

# विनामूल्य प्रकाशने

१. आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करणे
२. प्रामाणिकपणा
३. राज्याची स्थापना करणारे
४. प्रामाणिकपणा

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर **apcwo.org/publications** उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्य पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई—मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा.

तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (१ करिंथ २:४, ५; इबी. २:३, ४). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे समार्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **www.apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई–मेल पाठवावा : **contact@apcwo.org**

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे २००० वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रकट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यांस आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रकट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आोति. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या

मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, “पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे” (रोमियों ६:२३). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वत:ला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास — आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे — प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंत:करणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात” (प्रेषितांची कृत्ये १०:४३).

“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंत:करणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल” (रोम. १०:९).

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस : तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.

आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वत:चे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंत:करणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

नोट्स

नोट्स

नोट्स

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*